Vidyaniketan English Medium School
Tal.Khed Dist.Pune
Chakan

विशेष–अ.जा./मुं. सा. वि./५० म.

क्रमांक

030

सत्यमेव जयते

# नोंदणी प्रमाणपत्र

संस्था नोंदणी अधिनियम, १८६०

(१८६० चा अधिनियम २१)

नोंदणी क्रमांक महाराष्ट्र/ 935 /२००४/पुणे

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की "श्री एस. पी. देशमुख शिक्षण संस्था"
मु० पो० चाकण ता० खेड जि० पुणे
द्वारा - श्री शामराव सोनबाराव देशमुख
खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरीत्या नोंदणी करण्यात आली.

तारीख 15/6/04 १९ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

4/6/04

संस्थांचे सहायक निबंधक
पुणे विभाग, पुणे
विभाग.

Headmaster
Vidyaniketan English Medium School
Chakan.Tal.Khed.Dist Pune 410501

Vidyaniketan English Medium School ★ Chakan ★ Tal.Khed Dist.Pune

[विशेष-ध.अ./मुं.सा.वि./२म.

045

सत्यमेव जयते

## नोंदणी प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम २९) या अन्वये पुणे विभाग येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव "श्री. एस. पी. देशमुख शिक्षण संस्था" मु. पो. चाकण तालुका. खेड, जिल्हा पुणे:

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक एफ - १९४६८ (पुणे)

द्वारा - श्री. शामराव साहेबराव देशमुख. यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक २१।६।२००४ १९९ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

सही ......

पदनाम सहायक धर्मादाय आयुक्त
पुणे विभाग, पुणे

Headmaster
Vidyaniketan English Medium School
Chakan.Tal.Khed.Dist.Pune 410501

Vidyaniketan English Medium School Tal.Khed Dist.Pune ★ Chakan ★

महाराष्ट्र/ ३३९ /२००४/पुणे
दिनांक- ९/६/२००४

E-4164

**परिशिष्ट ब**

**: ज्ञापन :**

सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

१. **संस्थेचे नाव** :- श्री. एस पी देशमुख शिक्षण संस्था

२. **संस्थेचा पत्ता** :- द्वारा श्री शामराव साहेबराव देशमुख
मु. पो. चाकण, ता. खेड, जि. पुणे

३. **संस्थेची स्थापना** :- सदरहू संस्थेची स्थापना दि. १ /५ /२००४ रोजी पुणे येथे करण्यात आली.

४. **संस्थेचे ध्येय व उद्देश** :-

१. शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे, युवकांना शिष्यवृत्या देणे, शालोपयोगी वस्तूंचे वाटप करणे.

२. बालवाडी, शैक्षणिक संस्था, वाचनालय चालविणे, अंधअपंग, मुकबधीरांसाठी शाळा चालविणे.

३. युवकांसाठी वैद्यकीय मदत करणे, वैद्यकीय शिबिरे भरविणे, क्रीडा स्पर्धा आयोजीत करणे, देशी विदेशी खेळांचे साहित्य उपलब्ध करून देणे.

४. प्रौढ शिक्षण वर्ग, शिवणकाम वर्ग, युवकांसाठी टायपिंग व कॉम्प्युटर शिक्षणाचे वर्ग चालविणे.

५.युवकांसाठी कायद्याच्या चौकटीत बसतील असे सर्व सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतीक, व कलाकिडा विषयक प्रकल्प राबविणे.

६. अनाथ युवकांच्या व गोरगरिबांच्या मुला-मुलींसाठी शैक्षणिक मदत करणे, हुंडा बंदीचा प्रचार व प्रसार करणे त्यासाठी समाज प्रबोधनाचे कार्यक्रम राबविणे, दारूबंदीचा प्रसार करणे, गोरगरीब,विध्वा, अपंग,अंध, युवकांना शैक्षणिक, रोजगार व नोकरी विषयक मार्गदर्शन करणे, आरोग्यसेवा पुरवीणे.. आर्थीक दुर्बल घटकांसाठी विकास कार्यास मदत करणे. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी योजना राबविणे.

७. गोरगरिब युवकांसाठी पुस्तक पेढीची सोय करून देणे. त्यांना मोफत पुस्तके, शालोपयोगी वस्तु पुरविणे.

८. महिलांना महिला उद्योगांबाबत माहिती उपलबद्ध करून देणे, त्यांना प्रोत्साहन देणे. महिलाविकासाच्या विविध योजना राबविणे,अनाथाश्रम, वृद्धाश्रम,बालसंगोपन गृह, हॉस्पीटल निर्मिती, आया, नर्सिंग शिक्षण, आदी उपकम राबविणे.

९. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी अशा सारखे उत्सव साजरे करणे.

१०. आदर्श युवकांचा सत्कार समारंभ करणे, आदर्श युवक निर्माण करण्यासाठी संस्कार शिबीरे आयोजीत करणे.तसेच वादविवाद स्पर्धा,

R.S. Deshmukh

(श्री शामराव सा. देशमुख) (किरन का. शहा) (सौ. रोहिणी शामराव देशमुख)

**Headmaster**
Vidyaniketan English Medium School
Chakan.Tal.Khed.Dist.Pune 410501

Vidyaniketan English Medium School
Tal.Khed
Dist.Pune
★ Chakan ★

(8)

संमेलने, विविध स्पर्धा, खेळ आयोजीत करणे.सध्याच्या स्पर्धात्मक युगात निरनिराळया क्षेत्रात धडाडीने पुढे येण्यास मार्गदर्शन करणे.

१२.शैक्षणिक संस्था चालविणे, उदा. पुर्व-प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय करून देणे.

१३.कला, वाणिज्य, शास्त्र, लॉ, इंजि., मेडिकल, होमिओपाथिक आणि आयुर्वेदिक तसेच इलेक्टॉनिक शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे.

५. या संस्थेच्या नियम नियमावली प्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थची व्यवस्था अथवा कारभार सोपविण्यात आलेला आहे अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची नांव, हुद्दे, वय, पत्ते, व्यवसाय, आणि राष्ट्रीयत्व खलील प्रमाणे :-

| अं.न. | संपूर्ण नांव | वय | हुद्दा | व्यवसाय | राष्टीयत्व |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. साहेबराव परशुराम देशमुख | ६२ | कार्याध्यक्ष | रिटायर्ड | भारतीय |
| २ | श्री. शामराव साहेबराव देशमुख | ३७ | अध्यक्ष | समाजकार्य | भारतीय |
| ३. | श्री. किरण बाबुलाल शहा | ४३ | उपाध्यक्ष | व्यवसाय | भारतीय |
| ४ | सौ. रोहिणी शामराव देशमुख | ३४ | सेक्रेटरी | घरकाम | भारतीय |
| ५. | सौ. सुमन साहेबराव देशमुख | ५६ | खजीनदार | व्यवसाय | भारतीय |
| ६. | सौ. साधना किरन शहा | ३८ | सदस्य | घरकाम | भारतीय |
| ७. | श्री. ज्ञानेश्वर पांडूरंग सोनवणे | ४५ | सदस्य | शेती. | भारतीय |

सर्व राहणार मु. पो. चाकण, ता. खेड, जि. पुणे

७. आम्ही खालील सह्या करणार **श्री. एस पी देशमुख शिक्षण संस्था** द्वारा श्री शामराव साहेबराव देशमुख मु. पो. चाकण, ता. खेड, जि. पुणे या संस्थेचे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वेय अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येउन **श्री. एस पी देशमुख शिक्षण संस्था** ही संस्था आज दिनांक ?/ ? २००४ रोजी स्थापन केली असून ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर आज दिनांक? /? /२००४ रोजी सह्या केल्या आहेत...

| अ.नं. | संपूर्ण नांव | सही |
|---|---|---|
| १ | श्री. साहेबराव परशुराम देशमुख | [signature] |
| २ | श्री. शामराव साहेबराव देशमुख | [signature] |

R.S. Deshmukh

(श्री शामराव सा. देशमुख) (श्री किरन बा. शहा) (सौ. रोहिणी शामराव देशमुख)

Headmaster
Vidyaniketan English Medium School
Chakan.Tal.Khed.Dist.Pune 410501.

Vidyaniketan English Medium School Tal.Khed Dist.Pune ★ Chakan ★

(4)

३. श्री. किरण बाबुलाल शहा

४ सौ. रोहिणी शामराव देशमुख R.S. Deshmukh.

५. सौ. सुमन साहेबराव देशमुख

६. सौ. साधना किरन शहा Shah

७. श्री. ज्ञानेश्वर पांडूरंग सोनवणे

स्थळ : पुणे
दिनांक : १/१/२००४

वरील सह्या करणाऱ्या इसमांना मी ओळखतो व त्यांनी माझे समक्ष विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

Shrikant U. Deshmukh
M.Com., LL.B. (Advocate)
38, Kranti Society,
Parvati, Pune-411 009.

सही/विशेष कार्यकारी दंडाधिकारी/वकील

: **प्रतीज्ञापत्र** :

आम्ही खालील सह्या करणारे इसम **श्री. एस पी देशमुख शिक्षण संस्था** द्वारा श्री शामराव साहेबराव देशमुख मु. पो. चाकण, ता. खेड, जि. पुणे या संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सभासद असून प्रतिज्ञापूर्वक नमूद करीत आहोत की पुणे येथे व आजूबाजूच्या परिसरात **श्री. एस पी देशमुख शिक्षण संस्था** या नांवाची किंवा स्वरुपाची दुसरी कोणतीही संस्था अस्तित्वात नाही किंवा १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमानुसार नोंदणी झालेली नाही अथवा अस्तित्वात नाही.

सबब वरील प्रमाणे प्रतिज्ञापत्र सादर करीत आहोत.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | R.S. Deshmukh. सेक्रेटरी |
|---|---|---|
| श्री शामराव साहेबराव देशमुख | श्री किरन बा. शहा | सौ. रोहिणी शामराव देशमुख |

**Headmaster**
Vidyaniketan English Medium School
Chakan.Tal.Khed.Dist.Pune 410501

Vidyaniketan English Medium School
Tal.Khed
Dist.Pune
★ Chakan ★

(5)

महाराष्ट्र/ ८३४ /२००४/पुणे
दिनांक २४/६/२००४

६८६१७

परिशिष्ट 'क'

श्री. एस पी देशमुख शिक्षण संस्था द्वारा श्री शामराव ... देशमुख मु. पो. चाकण, ता. खेड, जि. पुणे या संस्थेची

सहायक धर्मादाय आयुक्त संस्था निबंधक पुणे विभाग, पुणे

## नियम व नियमावली

**१. नियमावलीतील संदर्भित शब्दांची व्याख्या :-**

१. संस्था :-
संस्था म्हणजे जिचे नांव संस्थेच्या ज्ञापनामध्ये समाविष्ट केलेले असून संस्था नोंदणी अधिनियम १८६० नुसार नोंदणी झालेली आहे.

२. उददेश :-
ज्यांचा उल्लेख संस्थेच्या ज्ञापनामध्ये कॉलम क. ४ मध्ये समाविष्ट केलेला आहे.

३. कार्यकारिणी :-
कार्यकारिणी म्हणजे संस्थेचे विश्‍वस्त, संस्थेचे कार्यकारी मंडळ वा संस्थेची कार्यकारिणी की ज्यांच्यावर संस्थेचे नियम व नियमावलीप्रमाणे संस्थेचा कारभार पाहण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

४. सभासद :-
ज्यांना संस्थेने सभासद म्हणून मान्यता दिली आहे व ज्यांनी संस्थेची ठरलेली सभासद वर्गणी संस्थेकडे भरलेली आहे.

**२. कार्यक्षित्र :-**
सदरहू संस्थेचे कार्यक्षित्र हे संपुर्ण भारतभर असे राहील.

**३. हिशोबाचे वर्ष :-**
सदरहू संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रील ते ३१ मार्च असे राहील.

**४. सभासदत्व व त्याची नोंदणीची पध्दत :-**
संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये राहणरया व १८ वर्षावरील कोणत्याही सज्ञान व्यक्तीस संस्थेचे सभसद होता येइल. त्याला संस्थेचे ज्ञापन, नियम व नियमावली मान्य असली पाहीजे. त्याने कार्यकारी मंडळाकडे विहीत नमून्यात लेखी अर्ज भरून तो कार्यकारी मंडळाकडे सादर केला पाहीजे. सदर कार्यकारी मंडळाचे सभेत बहुमताने मंजूर झाल्यास त्या व्यक्तीस मंडळाचे सभासदत्व प्राप्त होइल. सभासदत्वाचा अर्ज मंजूर करण्याचा अथवा नामंजूर करण्याचा पुर्ण अधिकार कार्यकारी मंडळास राहील.सभासदाची प्रवेश फी रु. ११/- व मासिक वर्गणी रु.१०/-अथवा रु. १२०/- अशी दरवर्षी भरणे

R. S. Deshmukh

श्री शामराव का. देशमुख    किरन बा. शहा    सौ. रोहिणी शामराव देशमुख

Headmaster
Vidyaniketan English Medium School
Chakan.Tal.Khed.Dist.Pune 410501

Vidyaniketan English Medium School Tal.Khed Dist.Pune * Chakan *

(6)

आवश्यक आहे. तरच अशा सभासदाचे सदस्यत्व त्या वर्षासाठी कायम केले जाईल.

५. **सभासदांचे प्रकार** :-

१. सामान्य सभासद :-

जे सभासद संस्थेची ठरलेली मासिक अथवा वार्षिक वर्गणी वेळचेवेळी संस्थेकडे जमा करतील व ज्या सभासदांना संस्थेने सामान्य सभासद म्हणून मान्यता दिली आहे, असे सभासद तसेच ज्यांची यादी संस्थेने नियमानुसार ठेवलेली आहे. सामान्य सभासदांना संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अथवा स्पेशल जनरल मिटींगला किंवा तातडीच्या सभेला हजर रहाण्याचा अधिकार राहील परंतु मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही.

२. देणगीदार सभासद :-

संस्थेच्या विकास निधीसाठी जो कोणी कमीत कमी रू.५००/- किंवा त्यापेक्षा जास्त रकमेची मदत करेल व सेस्थेच्या घटनेतील तरतुदींना मान्यताप्रप्त देणारी व्यक्ती, तसेच अशा व्यक्तींच्या सभासदत्वाला संस्थेच्या कार्यकारी मंडळाची मान्यता आवश्यक राहील. सदर सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेत मतदानाचा अधिकार राहणार नाही.

३. संस्थापक सभासद :-

संस्था चालू करण्यासाठी ज्या सभासदांनी प्रयत्न केले ते सभासद एकूण ७ असून त्यांना संस्थेचे आजीव सभासद म्हणून गणले जाईल सदर सभासदांनाच फक्त संस्थेच्या केल्या जाणारया ठरावांवर व घेतल्या जाणा-या निवडणूकीत मतदानाचा हक्क राहील.

६. **सर्वसाधारण सभा, तिचे अधिकार व कार्ये** :-

१. वार्षिक सर्वसाधारण सभा :-

वार्षिक सर्व साधारण सभा वर्षातून एकदा घेतली जाईल. सदर सभेची सूचना १५ दिवस अगोदर सभासदांना दिली जाईल. सभेची गणसंख्या ३/५ राहील. गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी सभा घेतली जाईल, या वेळेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२. अधिकार व कार्ये :-

अध्यक्षांची निवड करणे, संस्थेचे हिशोब, ताळेबंद, अंदाजपत्रक, वार्षिक अहवाल मंजूर करणे,ठरावांना मंजूरी देणे, कार्यकारी मंडळामार्फत आलेल्या घटना दुरुस्तींच्या सूचनांचा विचार करणे, ऑडीटरची नेमणूक करणे.

७. **सभासदत्व रद्द करणे** :-

खालील कारणांमुळे एखादया सभासदाचे सभासदत्व रदद होइल. १.त्याने राजीनामा दिल्यास २. तो अपंग अथवा वेडा झाल्यास ३. तो मृत्यू पावल्यास ४ . तो कायमचा परदेशात वास्तव्यासाठी गेल्यास ५. त्याच्यावर फौजदारी

R.S. Deshmukh

श्री शामराव वा. देशमुख श्री किरन का शहा सौ. रोहिणी शा देशमुख

Headmaster
Vidyaniketan English Medium School
Chakan.Tal.Khed.Dist.Pune 410501

Vidyaniketan English Medium School Tal.Khed Dist.Pune * Chakan *



गुन्हा शाबित झाल्यास ६. त्याने संस्थेच्या नियमावली विरुध्द वर्तन केल्यास. ७.त्याची तीन महिन्यापेक्षा मासिक वर्गणी थकल्यास. ८. कार्यकारी मंडळाच्या सतत ३ मिटींगला गैरहजर राहिल्यास.

८. **सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या** :-

सर्वसाधारण सभेची सूचना सभासदांना १५ दिवस अगोदर दिली जाईल. सूचना हस्तांतरीत किंवा पोस्टाने पाठविली जाईल. सभेची गण संख्या ३/५ राहील. गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी सभा घेतली जाईल. यावेळी गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

९. **विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्ये** :-

१. विशेष सर्वसाधारण सभा :-

काही तातडींच्या कामासाठी अध्यक्षांना अचानक विशेष सर्वसाधारण सभा बोलाविता येईल. सदर सभेची सूचना एक दिवस आगोदर दिली जाईल. या सभेत वार्षिक सर्वसाधारण सभेच्या बाबतीतलेच गणसंख्येचे नियम लागू राहतील.

२. विशेष सर्वसाधारण सभेची कार्ये :-

सदर सभेच्या सूचना पत्रिकेत नमूद केलेल्या विषयांवर चर्चा करणे, व तातडींच्या ठरावास मंजूरी देणे व निर्णय घेणे.

१०. **संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी यांची रचना** :-

संस्थेचे कार्यकारी मंडळ कमीत कमी सात व जास्तीत जास्त नउ सदस्यांचे राहिल.

१. अध्यक्ष २. उपाध्यक्ष ३. सेकेटरी ४. खजिनदार ५. सदस्य .

११. **कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणूक पद्धत** :-

१. कार्यकाल :-

सदरहू कार्यकारी मंडळाचा कार्यकाल पाच वर्षाचा राहील.

२. निवडणूकीची पद्धत :-

सदर पाच वर्षांनी संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नवीन कार्यकारिणीची निवड सिलेक्शन पद्धतीने पुढील पाच वर्षाच्या कालावधीकरीता करण्यात येईल. अध्यक्ष व सेकेटरी यांची निवड सभासद करतील व राहीलेल्या विश्वस्तांचे खातेवाटप अध्यक्ष करतील. कोणत्याही कारणांमुळे रिकामी झालेली विश्वस्तांची जागा राहीलेले विश्वस्त सभासदांमधून योग्य व्यक्तींची विश्वस्त म्हणून राहीलेल्या कालावधीसाठी निवड करतील. कार्यकारी मंडळाचा एखादा सभासद सहा महिन्यापेक्षा जास्त काळ सभांना गैरहजर राहील्यास त्याचे कार्यकारी मंडळातील सदस्यत्व रद्द करण्यात येईल. मतदान करण्याचा अधिकार फक्त संस्थापक सभासदास राहील.

R.S. Deshmukh

Headmaster
Vidyaniketan English Medium School
Chakan.Tal.Khed Dist.Pune 410501

Vidyaniketan English Medium School
Tal.Khed
Dist.Pune
* Chakan *



१२.कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कार्ये :-

१. अध्यक्ष :-
सभाचे अध्यक्षस्थान स्विकारणे, संस्थेच्या सर्व कामकाजावर लक्ष देणे, संस्थेला फायदेशीर असे निर्णय घेणे,समित्या व उपसमित्या नेमणे व त्यांना मार्गदर्शन करणे,एखादया महत्वाच्या निर्णयाबाबत समसमान मत पडल्यास एक जादा मत देणे.

२. उपाध्यक्ष :-
अध्यक्षांचे गैरहजेरीचे कालावधीत संस्थेच्या कामकाजावर लक्ष ठेवणे.

३. सेक्रेटरी :-
कार्यकारी मंडळाच्या सभा बोलाविणे,संस्थेचा पत्रव्यवहार पहाणे, संस्थेच्या कामकाजावर व कर्मचारयांवर लक्ष ठेवणे, त्यांचे तकारींचे निवारण करणे, अर्थसंकल्प अहवाल सादर करणे, किरकोळ नियम तयार करणे., संस्थेची सर्व कामे पहाणे, रोजचेरोज हिशोब तपासून त्यावर सहया करणे, खर्चाची बिले तयार करणे,व त्यास मंजूरी घेणे , संस्थेच्या मालमत्तेवर देखरेख ठेवणे,मंजूर ठराव अंमलांत आणणे,सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभेच्या नोटीसा काढणे.

४. खजीनदार :-
संस्थेचे सर्व आर्थीक व्यवहार पहाणे, आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण ठेवणे,जमाखर्च ठेवणे,जमाखर्चाचे अहवाल कार्यकारिणीपुढे ठेवणे, झालेला खर्च व जमा कार्यकारिणीच्या सभेत वाचून दाखवून त्यास मंजूरी घेणे.

५. सदस्य :-
कार्यकारी मंडळाच्या सभेस व सर्वसाधरण सभेस उपस्थित राहणे, संस्थेच्या आवश्यक त्या कामात मदत करणे.

६. इतर सभासद :-
सर्वसाधरण सभेस व विशेष सर्वसाधरण सभेस हजर रहाणे, संस्थेच्या कामात आवश्यक ती मदत करणे, संस्थेच्या हितासाठी मदत करणे.

१३.कार्यकारिणी मंडळाची सभा व मागणीची सभा :-

१. कार्यकारी मंडळाची सभा :-
कार्यकारी मंडळाची सभा महिन्यातून एकदा घेतली जाईल. सभा चिटणीसाच्या सहीने बोलावली जाईल. सभेची सूचना तीन दिवस आगोदर देता येईल. सभा संस्थेच्या कार्यालयात किंवा विश्वस्त ठरवतील त्या ठिकाणी घेतली जईल.

२. मागणीची सभा :-
एखादा अत्यंत तातडीचा व महत्वाचा निर्णय घेण्यासाठी सदस्यांनी लेखी मागणी केल्यास अध्यक्ष तातडीची मागणीची सभा बोलवतील. सदरहू सभेस कार्यकारिणीच्या सभेचे सर्व नियम बंधनकारक राहतील.

R.S. Deshmukh.

श्री. शामराव सा. हिंगुरव   श्री. किरन वा. २१वा.   प्रो. रोहिणी शा. देशमुख.

Headmaster
Vidyaniketan English Medium School
Chakan.Tal.Khed.Dist.Pune 410501

Vidyaniketan English Medium School Tal.Khed Dist.Pune ★ Chakan ★

(9)

१४.कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्या :-

१. कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना :-

कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना तीन दिवस आगोदर लेखी किंवा तोंडी देण्यात येईल.

२. कार्यकारी मंडळाच्या सभेची गणसंख्या :-

कार्यकारी मंडळाच्या सभेची गणसंख्या एकूण सदस्य ३/५ एवढी राहील.

१५.कार्यकारी मंडळाच्या निवडणूकीचे नियम :-

संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये दर पाच वर्षांनी सिलेक्शन पद्धतीने अध्यक्ष व सेक्रेटरी यांची निवड संस्थापक सभासदांमधून सर्वानुमते केली जाईल. राहिलेल्या विश्वस्तांचे खाते वाटप अध्यक्ष करतील. निवडणूकीस उभे राहण्याचा व मतदान करण्याचा अधिकार फक्त संस्थापक सभासदास राहील.

१६.कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरणेबाबत :-

कोणत्याही कारणांमुळे कार्यकारी मंडळातील एखादे पद रिक्त झाल्यास राहिलेले विश्वस्त सभसदांमधून योग्य व लायक अशा व्यक्तींची रिक्त पदावर राहिलेल्या कालावधीसाठी निवड करण्यात येईल.

१७.कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये :-

मंडळाचे कामकाज योग्य रितीने चालविणे, दैनंदिन कामकाजावर लक्ष ठेवणे,भावी योजनेचा आराखडा तयार करणे,वार्षिक अहवाल व हिशोब प्रसिद्ध करणे, समित्या व उपसमित्या नेमणे, मालमत्तेची देखभाल व दुरूस्ती करणे,संस्थेच्या उन्नतीसाठी सतत प्रयत्न करणे.

१८.संस्थेच्या निधी, मिळकत व विनीयोग :-

१. सभासदांकडून मिळालेली वर्गणी, देणगी इ. २. लोकांकडून मिळालेल्या पैशात व वस्तू स्वरूपात देणग्या. ३. सरकारी व निमसरकारी संस्थांकडून मिळालेल्या देणग्या, अनुदान, ग्रॅंट व बक्षिस इ. संस्थेला मिळणाऱ्या निधीचा विनियोग संस्थेच्या ध्येय व धोरणांसाठी केला जाईल.

१९.उद्दीष्टनिहाय खर्चाची तरतुद :-

संस्था आपल्या उत्पन्नापैकी ८० टक्के उत्पन्न संस्थेच्या उद्देशांवर खर्च करील व उरलेले २० टक्के उत्पन्न इतर आवश्यक त्या बाबींवर खर्च करील.

R.S. Deshmukh

श्री. शामराव बा. देशमुख. श्री. ????? बा. शहा. सौ. रोहिणी श्या. देशमुख.

Headmaster
Vidyaniketan English Medium School
Chakan.Tal.Khed.Dist.Pune 410501

(10)

२०.कर्ज किंवा ठेवी यासंबंधी तरतूद :-

संस्थेला आवश्यक वाटल्यास कोणत्याही व्यक्तींकडून किंवा संस्थेकडून कर्ज अगर ठेवी स्वीकारण्यात येतील मात्र त्याकरता मुं. सा. वि. व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ३५ अन्वये विभागीय मा. धर्मादाय आयुक्त/सह. आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक असून संस्थेवर बंधनकारक राहील .

२१.स्थावर मालात्ता खरेदी / विक्री करणेबाबतची तरतुद :-

संस्थेला तसे आवश्यक वाटल्यास स्थावर अथवा जंगम मालमत्ता खरेदी/विक्री करण्याचा अधिकार आहे. मालमत्ता खरेदी/विक्री अथवा भाडेपट्ट्याने देणे घेणे या व्यवहारापूर्वी संस्थेला विभागीय मा. धर्मादाय आयुक्त/सह. आयुक्त यांच्या परवानगीची आवश्यकता राहील व बंधनकारक राहील.

२२.बॅंक खाते :-

संस्थेची निधीपोटी जमा होणारी रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बॅंकेत संस्थेच्या नावाने खाते उघडून जमा केली जाईल. सदरहू खाते कार्यकारिणीच्या सभेत ठराव होउन दोन व्यक्तींच्या संयुक्त सहीने चालविले जाईल.

२३.सभासदांची यादी :-

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १५ प्रमाणे संस्थेचे जे सभासद असतील त्यांची एक यादी १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र अधिनियमातील नियम १५ प्रमाणे अनुसूची १,२,३, व ६ चे नमुन्यात ठेवण्यात येईल.

२४.नियम व नियमावलीतील बदल करण्याबाबतची तरतुद :-

संस्थेच्या ज्ञापन, नियमावलीतील बअल करावयाचा असल्यास व तसा बदल करणे सेस्थेच्या वार्षिक सर्वसाधरण सभेत ठराव घेवून ३/५ बहूमताने मंजूर झाल्यावर आवश्यक ते नवीन नियम करून घेता येतील किंवा कमी करता येतील. मात्र सोसायटीज रजि. ॲक्ट १८६० चे कलम १२ प्रमाणे कार्यवाही पूर्ण करावी लागेल.

R.S. Deshmukh

श्री. आमराव का. देशमुख, श्री किरन का. रावन, सौ. रोहिणी रा. देशमुख,

Vidyaniketan English Medium School Tal.Khed Dist.Pune ★ Chakan ★

Headmaster
Vidyaniketan English Medium School
Chakan.Tal.Khed.Dist.Pune 410501

Vidyaniketan English Medium School
Tal.Khed
Dist.Pune
★ Chakan ★



२५.<u>संस्थेच्या नांवात व उद्देशात बदल करण्याची तरतूद</u> :-

संस्थेचे नाव अथवा उद्दशात बदल करावयाचा झाल्यास अथवा दोन संस्थेचे विलीनीकरण करावयाचे असल्यास सोसायटीज रजि. ॲक्ट १८६० चे नोंदणी अधिनियमातील नियम १२ प्रमाणे अथवा १२-अ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

२६.<u>संस्थेचे विसर्जन</u> :-

संस्थेचे कार्य बंद करावयाचे असल्यास ३/५ सभासदांच्या बहूमताने सर्वसाधारण वार्षिक सभेत मंजूरी घ्यावी लागेल. संस्थेचे सर्वप्रकारचे देवाण-घेवाण संबंधीचे व्यवहार पूर्ण करावे लागतील. संस्थेची शिल्लक मालमत्ता दुसऱ्या या सारखेच उद्देश असलेल्या संस्थेला दान म्हणून द्यावी लागेल. सदरहू संस्थेच्या विसर्जनाची कार्यवाही सोसायटीज रजि. ॲक्ट १८६० चे कलम १३ व १४ प्रमाणे करावी लागेल.

<u>दाखला</u>

असे प्रमाणित करण्यात येते की सदरची प्रत ही **श्री. एस पी देशमुख शिक्षण संस्था** द्वारा श्री शामराव साहेबराव देशमुख मु. पो. चाकण, ता. खेड, जि. पुणे या संस्थेच्या ज्ञापन, नियम व नियमावलीची खरी प्रत असून ती बरोबर आहे.

| अ.न | संपूर्ण नांव | हूद्दा | सही |
|---|---|---|---|
| १ | श्री. शामराव साहेबराव देशमुख | अध्यक्ष | (signature) |
| २. | श्री. किरन बाबुलाल शहा | उपाध्यक्ष | (signature) |
| ३. | सौ. रोहिणी शामराव देशमुख | सेक्रेटरी | R. S. Deshmukh |

स्थळ :- पुणे.
दिनांक :- ९/५/२००४

श्री शामराव सा. देशमुख   श्री किरन बा. शहा

सही निशाणी खरी नक्कल
21.6.04

Headmaster
Vidyaniketan English Medium School
Chakan.Tal.Khed.Dist.Pune 410501